पुढारी

# नैसर्गिक आपत्तीमुळे आज, उद्या होणारी ऑनलाईन परीक्षा स्थगित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शिवाजी विद्यापीठाच्या १७ व १८ मे रोजी होणाऱ्या ऑनलाईन परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. याबाबतचे परिपत्रक परीक्षा विभागाने रविवारी रात्री उशिरा काढले आहे.




विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्रातील विद्यापीठ स्तरावरील सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. परंतु, राज्यात उद्भवलेल्या नैसर्गिक चक्रीवादळ आपत्तीमुळे सोमवार व मंगळवारी होणाऱ्या बीए., बीबीए, डीओटी, आदी परीक्षा परीक्षा स्थगित करण्यात येत आहेत. सुमारे २० हजार विद्यार्थी ऑनलाईन परीक्षेला बसणार होते. स्थगित केलेल्या परीक्षा पुन्हा २२ व २३ मे रोजी नियमित वेळेत होतील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या आज, उद्या होणाऱ्या परीक्षा स्थगित

## नैसर्गिक आपत्तीमुळे निर्णय : वीस हजार विद्यार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आज, सोमवारी आणि उद्या, मंगळवारी होणाऱ्या बी.ए., बीबीए., अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. राज्यामध्ये उद्भवलेल्या तौक्ते चक्रीवादळ आणि पाऊस नैसर्गिक आपत्तीमुळे विद्यापीठाने या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय रविवारी घेतला आहे. या परीक्षा दि. २२ आणि २३ मे रोजी घेण्यात येणार आहेत.

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० मधील हिवाळी सत्रातील विद्यापीठाच्या पातळीवर सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सध्या सुरू आहेत. मात्र, राज्यात अचानक उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मोबाईल नेटवर्क, वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या निर्माण होत आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी हित लक्षात घेत आज, सोमवारपासून दोन दिवसांतील परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी विद्यापीठाकडे केली. त्याबाबत



सकारात्मक निर्णय घेत विद्यापीठाने आज, सोमवारी आणि उद्या, मंगळवारी होणाऱ्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. या दोन दिवसांमध्ये बी.ए. सत्र तीन, बीबीए सत्र पाच आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या सत्र एकचे एकूण ५० पेपर होणार होते. त्यासाठी सुमारे वीस हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या परीक्षा दि.२२ (शनिवारी) आणि २३ मे (रविवारी) नियोजित वेळेत होणार आहेत. या परीक्षा स्थगित केल्याबाबत विद्यार्थ्यांना एसएमएस पाठविण्यात आले असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

तरुण भारत



# विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर ऑक्टोबर– नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्रातील ऑनलाइन परीक्षा सुरु आहेत. मात्र राज्यामध्ये चक्रीवादळ आल्यामुळे जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरु आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे १७ व १८ मे रोजी होणाऱ्या ऑनलाईन परीक्षा स्थगित केल्या आहेत. १७ मे रोजी होणारी परीक्षा २२ मे रोजी तर १८ रोजी होणारी परीक्षा २२ मे रोजी होणार आहे, अशी माहिती परिपत्रकाद्वारे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

- **गजानन पळसे यांची परिपत्रक का द्वारे माहिती**
- **१७ मेची २२ व १८ मेची २३ मेला नियमित वेळेत परीक्षा होणार**

राज्यामध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे ऑनलाईन परीक्षेसाठी नेटवर्क येण्यास अडचण निर्माण होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल याचा विचार करून या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. रविवारी दिवसभर विद्यापीठाच्या वेबसाईटला नेटवर्क नसल्याने परीक्षा स्थगितीचा निर्णय रात्री उशिरा घेण्यात आला. परीक्षा स्थगितीची नोंद सर्व परीक्षार्थींनी व महाविद्यालयांनी घ्यावी. या परीक्षेसंदर्भातील सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे असे आवाहन केले आहे.

सकाळ

# विद्यापीठाच्या परीक्षा वेळापत्रकात बदल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा सोमवारी (ता. १७) आणि मंगळवारी (ता. १८) होणार होत्या. मात्र, राज्यात उद्भवलेल्या चक्रीवादळामुळे या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. या परीक्षा २२ मे आणि २३ मे रोजी होतील, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिली आहे.

17 MAY 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माळ बहरला हिरवाईने

## पावसाच्या पाण्यावर जगवली ९०० झाडे; विद्यापीठाचा यशस्वी प्रयोग



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण विभागाच्या समोरील माळावर सागवान आणि कडुलिंब यांचे वनच तयार झाले आहे.

**“मुरमाड जमिनीत केलेली वृक्षलागवड यशस्वी ठरली. कमी पाण्यात येणाऱ्या झाडांची निवड केल्याने हे शक्य झाले. कमी पाण्याच्या ठिकाणी अशा प्रकारे वृक्षलागवड केल्यास ती यशस्वी ठरते, हे यावरून दिसून येते.**

**- डॉ. व्ही. एन. शिंदे,** उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

**सकाळ वृत्तसेवा**

आर. के. नगर, ता. १६ : मुरमाड जमीन, पावसाव्यतिरिक्त पाण्याचा थेंबही नाही. अशा परिस्थितही सुमारे ९०० झाडे जगवून वाढवण्याचा यशस्वी प्रयोग शिवाजी विद्यापीठाने केला आहे. यामुळे दूर शिक्षण विभागाच्या समोरील माळ हिरवाईने बहरला आहे. या ठिकाणी मुख्यत्वे करून सागवान आणि कडुलिंबाची झाडे लावली आहेत.

राज्यात गेल्या सहा वर्षांपासून वृक्ष लागवडीची मोठी चळवळ उभी राहिली. वनविभाग, सामाजिक वनीकरण या शासकीय विभागांसह सामाजिक संस्थांनीही यामध्ये मोठा सहभाग घेतला. मात्र, बहुतांशी



ठिकाणी झाडे जगण्याचे प्रमाण ५० ते ६० टक्के इतके आहे. पाणी न मिळाल्यामुळे झाडे वाळल्याचे दिसून येते. यासाठी जमिनीचा प्रकार, माती आणि तेथील जलस्रोत या गोष्टी लक्षात घेऊन वृक्षारोपण करणे गरजेचे असते. याचा एक यशस्वी प्रयोग शिवाजी विद्यापीठात करण्यात आला. येथील दूर शिक्षण विभागाच्या समोर क्रिकेट मैदानापर्यंत पावणे पाच एकरचा माळ आहे. या ठिकाणी खणले तर नुसता मुरूम मिळतो. अशा ठिकाणी विद्यापीठ प्रशासनाने वृक्षलावगड करण्याचे ठरवले.

मुरमाड जमिनीत खड्डा काढून त्यामध्ये काळी माती टाकून वृक्षलागवड केली जाते. मात्र, असे न करण्याचे विद्यापीठ प्रशासनाने ठरवले. त्यांनी या माळावर खड्डे काढून मुरमाड मातीतच वृक्षारोपण करण्याचे ठरवले. यासाठी सागवानाची ७०० आणि कडुलिंबाची ३०० रोपे लावली. केवळ पावसाचे पाणीच या रोपांना मिळते. मात्र, तरीही ही झाडे जगली. आता यांची उंची पाच फुटापर्यंत गेली आहे. जवळपास ९० टक्के झाडे जगली आहेत. सागवान आणि कडुलिंबाची झाडे कमी पाण्यातही जगतात. त्यामुळे आता हा परिसर हिरवागार बनला. दुष्काळी भागात याचे प्रयोग करणे सोयीचे ठरणार आहे.